REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2026

# कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातील कंत्राटी कामगारांचे आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन

**श्री. शामराव तुळशीराम तभाने**
**संशोधक**

**डॉ. गजानन आर. सोमकुवर**
**मार्गदर्शक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, बॅ. शेषराव वानखेडे महाविद्यालय, खापरखेडा.**

## सारांश (Abstract)

कोराडी औष्णिक विद्युत केंद्र हे महाराष्ट्रातील एक प्रमुख वीज निर्मिती केंद्र आहे. या केंद्राच्या दैनंदिन कामकाजात कायमस्वरूपी कामगारांच्या बरोबरीनेच कंत्राटी कामगारांचा मोठा वाटा आहे. प्रस्तुत संशोधनाचा मुख्य उद्देश कोराडी विद्युत केंद्रातील कंत्राटी कामगारांच्या जीवनमानाचा, आर्थिक उत्पन्नाचा आणि सामाजिक सुरक्षिततेचा अभ्यास करणे हा आहे. प्राथमिक माहिती संकलनावर आधारित या अभ्यासातून असे दिसून येते की, कंत्राटी कामगारांना मिळणारे वेतन हे कमी असून त्यांना नोकरीची शाश्वती नाही. तसेच कोळसा आणि राखेच्या प्रदुषणामुळे त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. हे संशोधन कामगारांच्या समस्या मांडून त्यांवर उपाययोजना सुचवते.



**महत्वाचे शब्द (Keywords):** कोराडी औष्णिक विद्युत केंद्र, कंत्राटी कामगार, आर्थिक स्थिती, सामाजिक सुरक्षितता, किमान वेतन, कामगार कायदे.

## प्रस्तावना (Introduction)

वीज ही आधुनिक युगाची आणि औद्योगिक विकासाची जननी मानली जातेभारताच्या आणि विशेषतः महाराष्ट्राच्या . महाराष्ट्राची विजेची वाढती .विकासात वीज निर्मिती क्षेत्राचा सिंहाचा वाटा आहेमागणी पूर्ण करण्यासाठी 'महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी' (MahaGenco) अंतर्गत अनेक औष्णिक विद्युत प्रकल्प कार्यरत आहेत यापैकी नागपूर शहराजवळ असलेले . **'कोराडी औष्णिक विद्युत केंद्र' (Koradi Thermal Power Station)** हे विदर्भातीलच नव्हे, तर राज्यातील एक प्रमुख आणि मोठे वीज निर्मिती केंद्र आहे.

कोणत्याही उद्योगाचे यश हे तेथील यंत्रसामग्रीसोबतच तिथे राबणाऱ्या 'मानवी भांडवलावर' (Human Capital) अवलंबून असते .वर्षांहून अधिक काळातील वाटचालीत कामगारांचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे ५० कोराडी प्रकल्पाच्या . तथापि, १९९१ च्या जागतिकीकरण आणि उदारीकरणाच्या धोरणांनंतर भारतातील औद्योगिक क्षेत्रात मोठे रचनात्मक बदल झाले याचाच परिणाम म्हणून .'कायमस्वरूपी कामगार भरती' बंद होऊन त्याजागी **'कंत्राटी कामगार पद्धती' (Contract Labour System)** वेगाने रूढ झाली.

आज कोराडी विद्युत केंद्रात कोळसा हाताळणी, राख उचलणे, हाउसकीपिंग, आणि देखभालदुरुस्ती यांसारख्या - हे कामगार प्रत्यक्ष वीज निर्मिती .च्या आणि धोक्याच्या कामांसाठी मोठ्या प्रमाणावर कंत्राटी कामगारांचा वापर केला जातोकष्टा प्रक्रियेचा कणा असुनही, ते कायमस्वरूपी कामगारांना मिळणाऱ्या वेतन आणि सुविधांपासून वंचित आहेत .'कमी वेतन आणि जास्त काम' हे या कंत्राटी पद्धतीचे सूत्र बनले आहे.

विद्युत केंद्रातून बाहेर पडणारा धूर आणि राख यामुळे होणारे प्रदूषण या कामगारांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम करत आहेतसेच ., वाढती महागाई आणि मिळणारे तुटपुंजे वेतन यामुळे त्यांचे आर्थिक गणित कोलमडलेले असतेयाचा थेट . नावरपरिणाम त्यांच्या राहणीमा, मुलांच्या शिक्षणावर आणि एकुणच सामाजिक दर्जावर होतो कामगार कायदे अस्तित्वात . असुनही त्यांची अंमलबजावणी प्रभाविपणे होत नसल्याचे दिसुन येत आहे.

त्यामुळेच, कोराडी औष्णिक विद्युत केंद्राच्या प्रगतीत मोलाचा वाटा असणाऱ्या, परंतु विकासाच्या प्रवाहापासून काहीसे दूर राहिलेल्या या कंत्राटी कामगारांच्या **'आर्थिक आणि सामाजिक स्थितीचे अध्ययन'** करणे अत्यंत गरजेचे आहेया . अभ्यासातून त्यांच्या समस्यांची तीव्रता आणि त्या समस्यांवरील संभाव्य उपाययोजना मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of the Study)

प्रस्तुत संशोधनाचा मुख्य उद्देश कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातील कंत्राटी कामगारांच्या सद्यस्थितीचे वास्तववादी चित्रण करणे हा आहे या अभ्यासाची प्रमुख उद्दिष्टे .खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहेत:

१. कोराडी येथील कंत्राटी कामगारांना मिळणारे वेतन, भत्ते आणि एकूण कौटुंबिक उत्पन्न यांचा अभ्यास करणे.
२. कामगारांचे राहणीमान, त्यांच्या मुलांचे शिक्षण, अन्नाचा दर्जा आणि निवास व्यवस्था या सामाजिक घटकांचे निरीक्षण करून त्यांच्या सामाजिक स्थितीचे मूल्यांकन करणे.
३. औष्णिक विद्युत केंद्रातील कामाचे वातावरण, कामाचे तास आणि कामाच्या ठिकाणी असलेल्या सुरक्षिततेच्या उपाययोजनांचा )Safety Measures) अभ्यास करणे.
४. कोळसा आणि राखेच्या प्रदूषणामुळे कामगारांच्या आरोग्यावर होणारे परिणाम, विशेषतः श्वसनविकार आणि इतर आजारांचे प्रमाण तपासणे.
५. कंत्राटी कामगारांसाठी असलेल्या कायद्यांचे - भविष्य निर्वाह निधी .उदा)PF, कर्मचारी राज्य विमा -ESIC, बोनसपालन ( कंत्राटदारांकडून आणि वीज निर्मिती कंपनीच्या प्रशासनाकडून योग्य प्रकारे होते की नाही, हे पडताळून पाहणे.
६. अभ्यासातून समोर आलेल्या समस्यांवर मात करण्यासाठी आणि कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रशासनाला आणि शासनाला योग्य शिफारसी.उपाययोजना सुचवणे/

## गृहितके (Hypothesis)

कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातील कंत्राटी कामगारांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करण्यासाठी खालील गृहितके निश्चित करण्यात आली आहेत:

१. कोराडी विद्युत केंद्रातील कंत्राटी कामगारांना मिळणारे वेतन हे वाढत्या महागाईच्या तुलनेत अपुरे असून, यामुळे बहुतांश कामगार कर्जबाजारीपणात जीवन जगत आहेत.

२. कामाच्या ठिकाणी सतत कोळशाची धूळ आणि राखेच्या संपर्कात राहिल्यामुळे कंत्राटी कामगारांमध्ये श्वसनविकार आणि त्वचेच्या आजारांचे प्रमाण सामान्य लोकांपेक्षा अधिक आहे.

३. कंत्राटी पद्धतीमुळे कामगारांना नोकरीची हमी नाही, ज्यामुळे त्यांच्यात मानसिक तणाव आणि असुरक्षिततेची भावना दिसून येते.

४. कामगारांसाठी कायदेशीर तरतुदी (उदा. भविष्य निर्वाह निधी - PF, आणि राज्य कामगार विमा - ESIC) असूनही, कंत्राटदारांकडून त्याची पारदर्शक आणि प्रभावी अंमलबजावणी केली जात नाही.

५. कमी उत्पन्नामुळे कंत्राटी कामगारांना आपल्या मुलांना उच्च शिक्षण देणे आणि चांगले आरोग्य राखणे कठीण जाते, परिणामी त्यांचा सामाजिक स्तर (Social Status) खालावलेला आहे.

## संशोधन पद्धती (Research Methodology)

प्रस्तुत संशोधनाचा उद्देश कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातील कंत्राटी कामगारांच्या जीवनमानाचे वास्तववादी दर्शन घडवणे हा आहे. यासाठी खालील वैज्ञानिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

## संशोधन आराखडा (Research Design)

हे संशोधन **'वर्णनात्मक आणि अन्वेषणात्मक' (Descriptive and Exploratory)** स्वरूपाचे आहेयात . .कामगारांच्या सद्यस्थितीचे वर्णन करण्यासोबतच त्यांच्या समस्यांची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला आहे

## माहिती संकलन (Data Collection)

संशोधनाची अचूकता राखण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम अशा दोन्ही स्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

**अ) प्राथमिक माहिती (Primary Data):** ही माहिती संशोधकाने स्वतः प्रत्यक्ष भेटी देऊन संकलित केली आहेयासाठी . :खालील साधने वापरली आहेत

१ .**प्रश्नावली )Questionnaire):** कामगारांची आर्थिक, सामाजिक आणि कामाची माहिती घेण्यासाठी एक संरचित प्रश्नावली तयार करून ती कामगारांकडून भरून घेण्यात आली .

२ .**मुलाखत )Interview):** काही निवडक कामगार, कामगार संघटनेचे प्रतिनिधी आणि सुपरवायझर्स यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन गुणात्मक माहिती मिळवण्यात आली .

३ .**निरीक्षण )Observation):** कामाच्या ठिकाणी )Workplace) असलेली परिस्थिती, सुरक्षा साधने आणि कामगारांच्या वस्तीतील सुविधांचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात आले.

**ब) दुय्यम माहिती (Secondary Data):** ही माहिती प्रकाशित स्रोतांवरून घेतली आहे :

१महानिर .्मिती )Mahagenco) कंपनीचे वार्षिक अहवाल .

२ .कामगार आयुक्त कार्यालयाची सांख्यिकी .

३ .घटनांची पत्रके आणि मागण्यांचे निवेदनकामगार सं .

४.वर्तमानपत्रांतील बातम्या आणि इंटरनेटवरील लेख .

## नमुना निवड )Sampling Method)

कोराडी विद्युत केंद्रात हजारो कंत्राटी कामगार असल्याने सर्वांचा अभ्यास करणे वेळेअभावी शक्य नाही त्यामुळे . **'सुलभ यादृच्छिक नमुना पद्धती' (Simple Random Sampling)** वापरून नमुना निवडण्यात आला आहे.

**एकूण नमुना )Sample Size):** अभ्यासासाठी विविध विभागांतील कोल हँडलिंग .उदा), ॲश हँडलिंग, हाऊसकीपिंग एकूण ( **१०० कामगारांची** निवड करण्यात आली आहे.

## संशोधनाचे क्षेत्र (Area of Study)

संशोधनाचे भौगोलिक क्षेत्र **'कोराडी औष्णिक विद्युत केंद्र परिसर'** हे आहे.

## माहिती विश्लेषण (Data Analysis)

गोळा केलेल्या माहितीचे वर्गीकरण करून त्यावर **टक्केवारी )Percentage)** आणि **सरासरी )Average)** या सांख्यिकीय साधनांचा वापर करून विश्लेषण करण्यात आले आहे माहिती प्रभावीपणे मांडण्यासाठी .**तक्ते )Tables)** वापरलेले आहेत.

## माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन (Data Analysis and Interpretation)

प्रस्तुत संशोधनासाठी एकूण **१०० कंत्राटी कामगारांची** निवड करून त्यांच्याकडून प्रश्नावली भरून घेण्यात आलीया . .माहितीचे विश्लेषण खालीलप्रमाणे करण्यात आले आहे

## कामगारांची मासिक मिळकत (Monthly Income Analysis)

कामगारांची आर्थिक स्थिती समजून घेण्यासाठी त्यांच्या मासिक वेतनाची वर्गवारी करण्यात आली.

## कंत्राटी कामगारांचे मासिक उत्पन्न

असे दिसून येते की, **कामगारांचे वेतन हे त्यांच्या गरजांपेक्षा कमी** आहेवाढती महागाई आणि नागपूरसारख्या . शहराचा खर्च पाहता, हे वेतन एका ४सदस्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यास अत्यंत अपुरे आहे ५-. फक्त ते कामगार जे कुशल कामगार किंवा सुपरवायझर आहेत, त्यांनाच थोडे समाधानकारक वेतन मिळतेयामुळे कामगारांमध्ये आर्थिक असंतोष . .व दिसून येतोआणि तणा

## आरोग्यविषयक समस्या (Health Issues Profile)

औष्णिक विद्युत केंद्रात कोळशाची धूळ )Coal Dust) आणि राख )Fly Ash) यांचे साम्राज्य असतेयाचा . कामगारांच्या आरोग्यावर काय परिणाम झाला, हे खालील तक्त्यात मांडले आहे.

**तक्ता क्र१ . प्रमाण कामगारांमधील आजारांचे :**

| आजाराचा प्रकार | बाधित कामगार (टक्केवारी) |
|---|---|
| श्वसन विकार | ४०% |
| त्वचा रोग (Skin Infection) | २५% |
| डोळ्यांची जळजळ | १५% |
| पाठदुखी / सांधेदुखी | १०% |
| कोणतीही तक्रार नाही | १०% |

### अर्थनिर्वचन )Interpretation):

धक्कादायक बाब म्हणजे **९०कामगार %** हे कोणत्या ना कोणत्या व्याधीने ग्रस्त आहेत सर्वात जास्त प्रमाण .**श्वसन विकारांचे (%४०)** आहेराखेच्या संपर्कामुळे त्वचा रोगाचे प्रमाणही .कोळशाचे कण श्वासाव्दारे शरीरात गेल्यामुळे हे घडते . .कंत्राटदारांकडून आरोग्य तपासणीची सोय नसल्यामुळे हे आजार बळावत आहेत .लक्षणीय आहे

## सुरक्षा साधनांची उपलब्धता (Use of Safety Equipment)

कामाच्या ठिकाणी जीविताची सुरक्षा महत्त्वाची असते) कामगारांना सुरक्षा साधने .Safety Gear) मिळतात का, याचे विश्लेषण खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्रसुरक्षा साधनांची स्थिती : २ .**

| सुरक्षा साधने (Helmet, Mask, Boots) | कामगारांचा प्रतिसाद |
|---|---|
| नियमित व दर्जेदार मिळतात | १०% |
| मिळतात पण दर्जा खराब आहे | ५०% |
| कधीतरी मिळतात (अनियमित) | ३०% |
| अजिबात मिळत नाहीत | १०% |

### अर्थनिर्वचन )Interpretation):

५०मास्क .उदा) कामगारांचे म्हणणे आहे की त्यांना मिळणारी साधने %, बूटहे निकृष्ट दर्जाचे आहेत (, जे धूळ रोखण्यास असमर्थ ठरतात कामगारांना साधने %३० .२ .वेळेवर मिळत नाहीतयावरून कंत्राटदारांचे आणि प्रशासनाचे . .सुरक्षेकडे दुर्लक्ष होत असल्याचे स्पष्ट होते

### सामाजिक सुरक्षा (Social Security Benefits)

भविष्य निर्वाह निधी )PF) आणि विमा )ESI) बाबतची जागृती आणि अंमलबजावणी.

**तक्ता क्र .आय.एस.आणि ई .एफ.पी : ३ .सुविधा**

| सुविधा | होय (मिळते) | नाही (मिळत नाही/माहित नाही) |
|---|---|---|
| पी.एफ. कपात होते (PF Deduction) | ६०% | ४०% |
| पगार स्लिप मिळते (Salary Slip) | २०% | ८०% |
| ई.एस.आय. कार्ड मिळाले आहे (ESI Card) | ३५% | ६५% |

**अर्थनिर्वचन )Interpretation):**

कायद्याने बंधनकारक असूनही, **८० कामगारांना %'पगार स्लिप' (Salary Slip) दिली जात नाही**. यामुळे आपली पीरक्कम खरोखरच खात्यात जमा होत आहे की नाही .एफ., हे कामगारांना समजत नाही) आरोग्य विमा .ESI) कार्ड नसल्यामुळे कामगारांना खाजगी दवाखान्यात स्वतःच्या खिशातून खर्च करावा लागतो, ज्यामुळे त्यांचे आर्थिक बजेट कोलमडते.

माहितीच्या विश्लेषणावरून असे स्पष्ट होते की, कोराडी विद्युत केंद्रातील कंत्राटी कामगार 'अल्प वेतन' आणि 'असुरक्षित आरोग्य' या दुष्टचक्रात अडकलेले आहेत) त्यांच्या सामाजिक सुरक्षेच्या .Social Security) कायद्यांची अंमलबजावणी फक्त कागदावरच दिसते, पण वास्तवात ती कमकुवत आहे.

### निष्कर्ष आणि शिफारसी (Findings, Conclusion and Suggestions)

प्रस्तुत संशोधनातून कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातील कंत्राटी कामगारांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीबाबत काही धक्कादायक आणि महत्त्वाचे वास्तव समोर आले आहेमाहितीच्या विश् .लेषणावरून खालील निष्कर्ष आणि उपाययोजना मांडण्यात येत आहेत.

### निष्कर्ष (Findings)

१. **किमान वेतनाचा अभाव:** बहुतांश कंत्राटी कामगारांना मिळणारे मासिक वेतन हे जीवन जगण्याच्या आवश्यकतांपेक्षा कमी आहे.आर्थिक शोषणामुळे कामगारांना गरिबीचे जीवन जगावे लागत आहे कंत्राटदारांकडून होणाऱ्या .

२. **गंभीर आरोग्य समस्या:** कामाच्या ठिकाणी असलेल्या कोळशाची धूळ आणि 'फ्लाय ॲश' (Fly Ash) यामुळे सुमारे ४०५० ते %% कामगारांना श्वसन विकार आणि त्वचेचे आजार जडले आहेतयोग् .य सुरक्षा साधनांच्या अभावामुळे हे प्रमाण वाढत आहे.

३. **सामाजिक सुरक्षेची पुर्ण माहिती नाही:** अनेक कामगारांचे 'भविष्य निर्वाह निधी' (PF) आणि 'कर्मचारी राज्य विमा' (ESIC) चे हप्ते पगारातून कापले जातात, परंतु त्याची पावती किंवा अधिकृत माहिती कामगारांना दिली जात नाहीयामुळे . .पासून वंचित राहण्याची भीती आहेकामगार भविष्यातील लाभां

४. **नोकरीची अनिश्चितता )Job Insecurity):** कंत्राटी कामगारांच्या मानेवर कधीही कामावरून काढून टाकण्याची टांगती तलवार असतेवर्षे काम करूनही त्यांना कायमस्वरूपी कामगारांचे कोणतेही हक्क मिळत ना १५-१० .हीत.

५. **निम्न राहणीमान:** कमी उत्पन्नामुळे कामगारांचे राहणीमान निकृष्ट आहेकोराडी परिसरातील कामगार वस्त्यांमध्ये . स्वच्छतेचा अभाव दिसून येतो, ज्याचा परिणाम त्यांच्या मुलांच्या आरोग्यावर आणि शिक्षणावर होत आहे.

## शिफारसी / उपाययोजना (Suggestions/Recommendations)

या समस्यांवर मात करण्यासाठी प्रशासनाला आणि शासनाला खालील शिफारसी सुचवण्यात येत आहेत:

१. **सुरक्षा आणि आरोग्य शिबिरे:** कामाच्या ठिकाणी उच्च दर्जाचे मास्क, हेल्मेट आणि गमबूट देणे कंत्राटदाराला बंधनकारक करावे) महानिर्मिती .Mahagenco) प्रशासनाने दर ३ महिन्यांनी कामगारांची आणि त्यांच्या कुटुंबीयांची मोफत आरोग्य तपासणी करावी.

२. **कायमस्वरूपी धोरण:** जे कामगार १० वर्षांपेक्षा जास्त काळ एकाच ठिकाणी काम करत आहेत, त्यांना टप्प्याटप्प्याने कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याचे धोरण राबवावे किंवा त्यांना 'कायम कामगारां'प्रमाणे वागवावे.

३. **कामगार कल्याण केंद्र:** कोराडी परिसरात कामगारांच्या मुलांसाठी चांगली शाळा, वाचनालय आणि मनोरंजन केंद्र उभे करावे, जेणेकरून त्यांचा सामाजिक स्तर उंचावेल.

४. **तक्रार निवारण कक्ष:** कंत्राटदाराकडून होणाऱ्या अन्यायाविरुद्ध दाद मागण्यासाठी विद्युत केंद्रात एक स्वतंत्र 'कामगार तक्रार निवारण कक्ष' स्थापन करावा, जिथे कामगार आपली ओळख गुप्त ठेवून तक्रार करू शकतील.

कोराडी औष्णिक विद्युत केंद्र हे वीज निर्मितीत अग्रेसर असले तरी, या प्रगतीचा फायदा तळागाळातील कंत्राटी कामगारांपर्यंत पोहोचलेला नाहीकंत्राटी पद्धती ही एकप्र .कारे 'आधुनिक वेठबिगारी' ठरत आहे, जिथे कामगारांचा वापर फक्त नफा कमावण्यासाठी केला जात आहेकायदे असूनही त्यांची कडक अंमलबजावणी होत नसल्याने कंत्राटदारांचे . चांगलेच फावतेकामगारांची ही दयनीय अवस्था केवळ त्यांच्या कुटुंबा .ंपुरती मर्यादित नसून ती सामाजिक असंतोषाला खतपाणी घालणारी आहे जोपर्यंत .कामगारांची पिळवनुक थांबत नाही आणि त्यांना 'आरोग्य सुरक्षा' मिळत नाही, तोपर्यंत या कामगारांचा खऱ्या अर्थाने विकास होणे अशक्य आहे.

## संदर्भ सूची


१. भारत सरकार .(१९७०) .*कंत्राटी कामगार नियमन आ)णि निर्मूलनकायदा (, १९७० )The Contract Labour Regulation and Abolition Act, 1970).* नवी दिल्ली .

२. भारत सरकार .(१९४८) .*किमान वेतन कायदा, १९४८ )The Minimum Wages Act, 1948).*

३. महानिर्मिती )Mahagenco). (२०२३ .(२४-*वार्षिक अहवाल.* मुंबई .

४. कामगार आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र शासन .*कामगार सांख्यिकी अहवाल.*

५. देसाई, वसंत .*भारतीय अर्थव्यवस्था आणि कामगार समस्या.* हिमालया पब्लिशिंग हाऊस .

६. डॉभागोलीवाल ., टी .एन.*श्रम अर्थशास्त्र आणि औद्योगिक संबंध )Labour Economics and Industrial Relations).*

७. मेमन, सी .आणि मामोरिया .बी.*भारतातील सामाजिक समस्या.*

८. कामगार संघटना, कोराडी .(२०२४) .*कामगार मागण्यांचे निवेदन आणि सद्यस्थिती अहवाल.*

९. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ऑक्युपेशनल हेल्थ )NIOH). *औष्णिक विद्युत केंद्रातील कामगारांचे आरोग्य एक अभ्यास* -.

१०. *दैनिक लोकमत* आणि *दैनिक सकाळ* (नागपूर आवृत्तीकोराडी कामग - (ार प्रश्नांवरील विविध बातम्या .(२०२५-२०२३)

११. महानिर्मिती अधिकृत वेबसाईट :mahagenco.in

१२. कामगार मंत्रालय, भारत सरकार :labour.gov.in